# नागरीकाची सनद

**प्रस्तावना:-**

शासनाचे दिनांक ०६-०३-१९९७ चे आदेशान्वये जि. प. अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाची निर्मिती करण्यात आली. या विभागा अंतर्गत पुर्वी जि. प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ, राळेगाव, वणी, पांढरकवडा, पुसद व दारव्हा असे एकुण ६ उपविभाग होते.परंतु पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र. जिपआ 2016 प्र.क्र.301/पापु-२३ दिनांक 28 डिसेंबर 2022 अन्वये जिल्हा परिषदामधील ग्रामिण पाणी पुरवठा विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला असुन पाणी पुरवठा विभागाचे वाढलेले कामकाज विचारात घेता प्रत्येक तालुक्यासाठी 1 स्वतंत्र उपविभाग मंजुर करण्यास मान्यता मिळालेली आहे.त्याअनुषंगाने आता 16 तालुक्यात ग्रामिण पाणी पुरवठा उपविभागाची निर्मीती करण्यात आलेली आहे. या विभागाकडुन रु. 5.00 कोटी पर्यंतची नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे केली जातात.तसेच 2.00 कोटी पर्यतच्या कामांना तांत्रीक मान्यता प्रदान केली जाते. तसेच विभागीय नळ योजनांची व पुर्ण झालेल्या परंतु अहस्तांतरीत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. या व्यतीरीक्त या विभागाच्या अधिनस्त यांत्रीकी उपविभाग अंतर्भुत करण्यात आलेला आहे. या उपविभागाकडुन नवीन हातपंप, विद्युतपंप दुहेरी पंप सौर पंप ई. कामे केली जातात. तसेच भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे सहाय्यक भुवैज्ञानीक व कनिष्ठ भुवैज्ञानीक यांची पाणी पुरवठा योजने करिता व विंधन विहीरीकरिता स्थळ निरीक्षण करुन उद्‌भव प्रमाणपत्र देण्या करिता जि. प. ग्रामीण पाणी पुरवठा विभागा कडे प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे.

**विभागाची रचना:-**

**ग्रामिण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत कार्यकारी अभियंता यांचे अधिनस्त आस्थापना शाखा,लेखा शाखा,तांत्रीक शाखा,टंचाई शाखा,अंकेक्षण शाखा असुन या शाखांकडे करण्यात आलेल्या कार्यालयीन कामाच्या विषयाची विभागणी परिशिष्ट-1 मध्ये दर्शविली आहे.**

# ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,यवतमाळ
## नागरीकांची सनद तयार करुन प्रसिध्द करणे.
## शासन परीपत्रक साप्रवि/ नासद-2011/18/अ/दिनांक 6 सप्टेंबर 2011
## नागरिकांसाठी राबविण्यात येणा-या योजनांबाबत.

परिशिष्ट ०:- 1

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी यांचे नाव व हुद्या | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकारी यांचे नाव व हुद्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | **या विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येत नाही.** | | | |
| 1 | ग्रामिण भागात मागणी आधारीत पाणी पुरवठा योजना तयार करुन निधी उपलब्धतेनुसार कार्यान्वयन करणे योजनेच्या अनुषांगीक कामास तांत्रीक मान्यता प्रदान करणे,देखभाल व कार्यक्रमांअंतर्गत प्रशासकिय व तांत्रीक मंजुरात प्रदान करणे. | कार्यकारी अभियंता | किमान 90 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 2 | देखभाल व दुरुस्ती कायक्रमाअंतर्गत प्रशासकिय व तांत्रीक मंजुरात प्रदान करणे. | कार्यकारी अभियंता | 7 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 3 | ग्राम पंचायतीकडुन तांत्रीक मंजुरीसाठी प्राप्त होणारे प्रस्तावांना तांत्रीक मान्यता प्रदान करणे | कार्यकारी अभियंता | 7 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 4 | पाणी टंचाई कार्यक्रमांअंतर्गत प्राप्त प्रस्ताव तपासणी करुन मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कडे मान्यतेस्तव सादर करणे. | कार्यकारी अभियंता | 7 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 5 | मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडुन पाणी टंचाई अंतर्गत प्राप्त प्रस्तावावर कार्यवाही करणे | कार्यकारी अभियंता | 7 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 6 | यांत्रीकी उपविभागाकडुन नवीन हातपंप, विद्युतपंप दुहेरी पंप सौर पंप ई. कामे. | उपभियंता (यांत्रीकी)/ कार्यकारी अभियंता | 30 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | स्थानिक आमदार/खासदार निधी अंतर्गत कामे तसेच प्राप्त अनुदानातुन मंजुर तथा झालेल्या कामाची देयके अदा करणे . | कार्यकारी अभियंता | 30 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 8 | जिल्हा स्तरावरील व विभागीय स्तरावरील लोकशाही दिन प्रकरणे निकाली काढणे | कार्यकारी अभियंता | 30 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 9 | सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे,कुटुब निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढणे | कार्यकारी अभियंता | 30 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |

कार्यकारी अभियंता
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद,यवतमाळ.

# कार्यालयाची संरचना

**कार्यकारी अभियंता**

**उपकार्यकारी अभियंता**

**सहा.प्रशासन अधिकारी** **सहा.अभियंता / कनिष्ठ अभियंता** **सहा.लेखा अधिकारी**

वरिष्ठ सहा/कनिष्ठ सहा. वरिष्ठ सहा/कनिष्ठ सहा.

परिचर परिचर

**कार्यालयाची वेळ ः- सकाळी 9.45 ते 6.15**